।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४२

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २१ वे | रविवार दि.१७ नोव्हेंबर २०२४ पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ४३ वा

# शहाजीबापू पाटील यांना विक्रमी मतांनी विजयी करा, तुमची इच्छा पूर्ण करु-मुख्यमंत्री शिंदे

## आ.शहाजीबापू पाटील यांच्या प्रचारसभेसाठी न भूतो न भविष्यती अशी ऐतिहासिक गर्दी



सांगोला : २५३ सांगोला विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार आमदार शहाजीबापू पाटील यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करून समोरच्याचे डिपॉझिट जप्त करा. विरोधक पुन्हा निवडणुकीची भाषा करणार नाहीत . सांगोलेकरांना फक्त बापूच हवेउ आहेत .आम. शहाजीबापू पाटील यांना तुम्ही प्रचंड मताधिक्याने विजयी करा. ॲड. शहाजीबापूंच्या प्रचार सभेसाठी न भूतो न भविष्यती गर्दी पाहून आमदार शहाजीबापूंचा या निवडणुकीत विजय निश्चित असून तुमची इच्छा पूर्ण करू असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगोला येथे दिले .

२५३ सांगोला विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार शहाजीबापू एपाटील यांच्या प्रचारार्थ शुक्रवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२४ रोजी न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावरती आयोजित केलेल्या ऐतिहासिक प्रचारसभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. पुढे बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आमदार शहाजीबापू पाटील हे माझे सर्वात लाडके आमदार आहेत .बापू बोलायला लागले की भल्या भल्यांची विकेट घेतात. २३ तारखेला शहाजीबापू पाटील मोठ्या मताधिक्याने विजयी होतील. बापू फटाके व गुलाल पहिल्यापेक्षा जास्ती तयार ठेवा असे मुख्यमंत्र्यांनी आनंदाने सांगितले. सांगोल्याचा आवाज आम. शहाजीबापू पाटील यांच्या रूपाने विधानभवनात गाजणार आहे. शहाजीबापू पाटील तुम्ही विजयाची साखर वाटायला तयार व्हा .आम. शहाजीबापूं पाटील यांनी गुवाहाटी ,मुंबई जिंकले .तो डायलॉग जगभर पोहचला. बापूंनी मतदारसंघांमध्ये शेतकरीवर्ग व सर्वसामान्यांच्या कष्टाला न्याय देत प्रचंड विकास कामे केली. येथील शेतकरी प्रचंड प्रमाणात कष्ट करून डाळिंब बागा फुलवतो. बापूंनी गेल्या दोन वर्षात तालुक्याची परिस्थिती बदलली. तालुक्यातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला. ५ हजार कोटी निधीतून तालुक्यातील अनेक विकास कामे पूर्ण करीत सर्वसामान्यांना खऱ्या अर्थाने न्याय दिला. महाविकास आघाडी सरकार पेक्षा महायुती सरकारने तालुक्याला मोठ्या प्रमाणात निधी देऊन दानत दाखवली आहे.त्यासाठी मोठे मन लागते. विरोधकांना आता पाण्यातही बापू दिसतात .स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना राबवण्यासाठी उजनीचे २ टीएमसीउ पाणी मिळवले त्यासाठी ८८५ कोटी रुपये निधी मंजूर केला. दिलेला शब्द पाळणारे व्यक्तिमत्व म्हणजे आमदार शहाजीबापू पाटील अशी त्यांची ओळख आहे. शहाजीबापूंनीच महायुती सरकारच्या सत्ता स्थापनेच्या वेळी मिशन पूर्ण केले. हे सरकार लाडक्या बहिणींना भविष्यात २१०० रुपये देणार .शेतकरी सन्मान योजनेसाठी १५ हजार रुपये करणार. वयोवृद्ध लाभार्थ्यांना २१०० रुपये देणार, २५ लाख रोजगार देण्याचा निर्णय घेतला आहे, पोलीस दलात २५ हजार महिला पोलिसांची भरती करणार ,शेतकऱ्यांचे साडेसात एचपीच्या आतील विज बिल माफ केले.घरगुती व इतर वापरातील लाईट बिलावर ३० टक्के सवलत देणार, २०२९ विजयी महाराष्ट्र म्हणून जाहीर करणार असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगोला येथे जाहीर सभेत स्पष्ट केले .



यावेळी शहाजीबापू पाटील म्हणाले, माझ्या प्रचारार्थ मुख्यमंत्र्यांच्या विजयी संकल्प सभेसाठी उपस्थित असलेल्या बंधू-भगिनींची गर्दी पाहून या सर्वांनी मते दिली तर माझा विजय आज निश्चितउ झाला हे जाहीर केले .माझी लढाई ही तालुक्यातील दुष्काळा विरोधात होती. तालुक्याला टेंभू, म्हैसाळ,उजनी योजनेचे पाणी आणून तालुक्यातील शेती सिंचनाचा प्रश्न मार्गी लावला. ८१ गावची शिरभावी पाणीपुरवठा योजना नव्याने मंजूर करून घेतली. त्यासाठी मोठा निधी खर्च करण्यात येणार आहे. रोजगार हमीचा तालुका, ऊसतोड कामगारांचा तालुका आशी तालुक्याची ओळख संपुष्टात आणली .नोकरीसाठी बाहेर जाणाऱ्या तरुणांचा लोंढा थांबवून तालुक्यातच नोकरी देण्यासाठी मोठी एमआयडीसी आणून तरुणांना भवितव्य देणार . स्व.आमदार गणपतराव देशमुख यांच्याकडे ५५ वर्ष व दीपकआबा साळुंखे पाटील यांच्याकडे ६ वर्षे आमदारकी होती .त्यांनी या कालावधीत पाण्याची एकही योजना व विकासाचे काम केले नाही. त्यांनी आणलेला निधी व केलेले काम तपासा व मी आणलेला निधी व सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून आणलेला निधी तपासा. दीपक आबाचे जवळा गाव हे मी म्हैसाळ योजनेत समाविष्ट केले. मी आणलेल्या पाण्यावर ते भविष्यात ऊस पिकवतील .

पान नंबर ३ वर......

# डॉ.बाबासाहेब देशमुख हे निश्चित विधानसभेत जातील : खासदार धैर्यशील मोहिते-पाटील

सांगोला : गेल्या पाच वर्षात सांगोला तालुका कॉन्ट्रॅक्टरांच्या विळख्यातून बाहेरच निघाला नाही, त्यामुळे सर्व सामान्य माणसांकडे बघायला लोकप्रतिनिधींना वेळच मिळाला नाही. त्यामुळे सांगोला तालुक्याचा विकास करणे हेच आमच्या पुढील मोठे आव्हान आहे. येणाऱ्या काळात सांगोला तालुक्यात एमआयडीसी, चांगल्या दर्जाची शैक्षणिक संकुले उभारणार असल्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगून आदरणीय पवार साहेबांनी आदेश दिल्याप्रमाणे आज मी डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या प्रचारासाठी आलो आहे. डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या डोक्यावरती पवार साहेबांचा हात असून डॉ.बाबासाहेब देशमुख हे निश्चित विधानसभेत जातील, असाविश्वास व्यक्त केला. सांगोला विधानसभा मतदार संघाचे



महाविकासआघाडी-इंडिया अलायन्स पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. बाबासाहेब आण्णासाहेबएदेशमुख यांच्या प्रचारानिमित्त माढा लोकसभा मतदार संघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिरभावी, मेडशिंगी, वाटंबरे, कडलास , सोनंद येथे जाहीर सभा संपन्न झाल्या. यावेळी डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ.अनिकेत देशमुख,ज्येष्ठ नेते बाबुराव गायकवाड, दत्ता सावंत, अतुल पवार, बापूसाहेब ठोकळे यांच्यासह मित्र पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना खासदार धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले की, ज्या कुटुंबामागे पवार साहेब संपूर्ण हयात भर ठामपणे उभे राहिले अशा लोकांनी त्यांच्याशी गद्दारी करणे कितपत योग्य आहे असा सवाल उपस्थित करून, लाभ घेतलेल्यांनी पवार साहेबांशी गद्दारी केली त्यामुळे जनतेने आता ठरवले आहे की पवार साहेबांबरोबर जे लोक इमानदार राहिले त्यांना निवडून द्यायचे त्यामुळे पवार साहेबांचा डोक्यावरती हात असणारे सर्व उमेदवार विधानसभेत जातील असा विश्वास व्यक्त करत सांगोला तालुक्यातील नागरिकांनी शेतकरी कामगार पक्षाच्या पाठीमागे ठामपणे उभे राहावे असे आवाहन त्यांनी केले. महाविकास आघाडीचे तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचेखासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या सांगोला येथील एन्ट्रीने तालुक्यातील नेत्यांची हवा टाईट झाली आहे. मोहिते-पाटील यांनी शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रचाराचा धडाका लावल्याने डॉ. बाबासाहेब देशमुख हेच महाविकास आघाडीचे सांगोला तालुक्यातील अधिकृत उमेदवार असल्याचे स्पष्ट होताना दिसत आहे. डॉ.बाबासाहेब देशमुख म्हणाले की, स्व. आबासाहेबांनी सूतगिरणी काढून रोजगार निर्मितीचे काम केले आहे.तालुक्यातील दोघांनी आजपर्यंत रोजगार निर्मितीसाठी काय काम केले याचा जनतेने विचार केला पाहिजे. गेल्या पाच वर्षात प्रस्थापितांनी गोरगरिबांच्या मुलांचे जीवन उध्वस्त करण्याचे काम केले असून वाळू व्यवसाय कडे मुलांना आकर्षित केले गेल्यामुळे आज तरुण वर्ग व्यसनाधीनेकडे मोठ्या प्रमाणात गेला असल्यामुळे आता विचार करण्याची वेळ आली आहे.

पान नंबर ४ वर....

# सांगोला तालुक्यात शेकापच्या महिला आघाडीचा डंका...!

## महिला आघाडी कडून डॉ.बाबासाहेब देशमुख यांचा जोरदार प्रचार



सांगोला : अडी अडचणीत मदतीला धावणारे, चुटकी सरशी कामे मार्गी लावणारे, वेळप्रसंगी स्वखर्चातून कामे करुन दिलासा देणाऱ्या डॉ.बाबासाहेब देशमुख यांना या निवडणूकीत आमचा पाठींबा आहेच. याशिवाय शिट्टी हे चिन्ह घराघरातपोहचवून डॉ.बाबासाहेब देशमुख यांना विजयी करण्याचा संकल्प शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडीने केला आहे.

महिनाभरात महागाई किती वाढली. इतकी वाढली की, माता भगिनींचेमहिन्याचे बजेट कोलमडले आहे. मतदार संघातील विकासाला खिळ बसलीय, आता तुम्ही साथ द्या, तुमच्या साक्षीने सांगोला विधानसभा मतदारसंघाचे नंदनवन करु, असे आवाहन डॉ.निकीताताई देशमुख यांनी केले. सांगोला विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी–इंडिया अलायन्स पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. बाबासाहेब आण्णासाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ उसांगोला शहरासह ग्रामीण भागात स्व.आबासाहेबांची कन्या शोभाताई पाटील, डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या पत्नी डॉ.निकीताताई देशमुख व मिथीला देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जोरदार प्रचार सुरु आहे.

प्रचारासाठी सुप्रिया देशमुख, स्वाती मगर, विद्या जाधव फरजना खतिब, वैशाली झपके, स्मिता बनसोडे, सविता बनसोडे, रेखा बनसोडे, हिना मुलाणी, वैशाली बेहेरे, स्मिता बेहेरे, स्मिता देशमुख, सुरेखा मदने, संजीवनी शिंगाडे, छाया एरंडे, नीताताई ढोबळे, सुरेखा सपाटे, उषा लोखंडे, राणी लवटे, गीता गुळमिरे, निलोफर मुजावर, शुभांगी बनसोडे, कोमल भंडारे, स्मिता झंगोले, मीनाक्षी येड्गे, शोभा फुले, सुरेखा पवार, शोभा पाटील, स्वाती गावडे, सुप्रिया माने, स्नेहा कुमठेकर, अलका कोळेकर, कुसुम जानकर, अंजू माने,ए सीमा कांबळे, डॉ.मेघना देवकते, अर्चना शिंदे, नीलिमा शिंदे, भिंगे मॅडम, छाया पाटील, कोमल कांबळे, शोभा माळी, मंगल बनसोडे, राजश्री जाधव, शोभा खड्तरे, ताई ढेरे, लता बनकर, मंगल चौगुले, जयश्री पाटील, चंद्रप्रभा माने, सुनीता लिगाडे, सीमा कांबळे, दीप्ती कुलकर्णी, स्मिता झंगोले, कोमल भंडारे, उयोगिता तरकसबंद, अेशिनी दौंडे, माधुरी जाधव, स्वाती चव्हाण, श्रद्धा देशमुख, इंदिरा येड्गे, गीता दौंडे, सुजाता दौंडे, रूपाली मदने, उषा देशमुख, जया नायकुडे, कविता रेड्डी, पिंकू मदने, सविता लोखंडे, सविता बनसोडे, रतन बनसोडे, कोमल सुरवसे, जरीना मोगल, यांच्यासह असंख्य महिला पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

# महायुती सरकारच्या काळात अनेक योजना मार्गी लावल्या; समाजातील प्रत्येक घटकाला खऱ्या अर्थाने न्याय दिला : केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदासजी आठवले

सांगोला : राज्यात महायुती सरकारने चांगल्या प्रकारे कार्य केले आहे. महायुती सरकारच्या काळात अनेक योजना मार्गी लावल्या. समाजातील प्रत्येक घटकाला खऱ्या अर्थाने न्याय दिला आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून आमदार शहाजीबापू पाटील यांनी सांगोला तालुक्यात दलीत समाजाचा सर्व प्रकारचा निधी खर्च करून समाजाला विकासाच्या प्रवाहात आणले आहे. बापूंनी दलित समाजासाठी १०० कोटी निधी खर्च करून समाजाचा विकास साधला. आमदार शहाजीबापू पाटील यांच्यासारखे कणखर नेतृत्व विधानसभेत पाठवण्यासाठी बापूंना सर्वांनी भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदासजी आठवले यांनी सांगोला येथे केले.

सांगोला मिरज रोडवरील सदानंद मल्टीपर्पज हॉल येथे बुधवार दिनांक १३ नोव्हेंबर रोजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या सभेमध्ये नाम.रामदासजी आठवले बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत,. श्रीकांतदादा देशमुख, राजश्रीताई नागणे पाटील, तालुकाध्यक्ष दुर्योधन हिप्परकर, माजी नगराध्यक्ष नवनाथ पवार, शिवसेनेचे नेते विजय शिंदे, दलित समाजाचे सोलापूर जिल्ह्यातील व सांगली जिल्ह्यातील पदाधिकारी ,मान्यवर, तसेच रामस्वरूप बनसोडे, कीर्तीपाल बनसोडे, दामोदर साठे आदी मान्यवर उपस्थित होते.




पुढे बोलताना नाम. रामदासजी आठवले म्हणाले, दलित पँथरच्या चळवळीपासून आमदार शहाजीबापू पाटील व माझी मैत्री आहे. शहाजीबापूंनी तालुक्याच्या प्रत्येक गावात विकास केला आहे. दलित समाजासाठी त्यांनी मोठी मदत केली आहे. तुम्ही मी कधी येणार याची वाट पाहत होता. परंतु मी बापू कधीआमदार होतील याची वाट पहातोय .शहाजीबापू एक धाडसी नेतृत्व आहे. ते पूर्वी महाविकास आघाडी सरकारमध्ये होते. परंतु राज्याच्या राजकारणात मोठी क्रांती करून शहाजीबापू महायुतीचे नेते बनले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील महायुती सरकारने राज्यात विकासाभिमुख कार्य करून लोकप्रियता मिळवली. सांगोला तालुक्यातून शहाजीबापूंना निवडून आणण्यासाठी मी आलो आहे. महायुतीला राज्यात चांगला प्रतिसाद असल्याचे ना.रामदास आठवले यांनी केले आहे .

यावेळी आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, गेल्या ३५ वर्षात मी चळवळ उभी केली. चळवळीच्या माध्यमातून मला तालुक्याचा विकास करून दुष्काळावर मात करता आली.येत्या वर्षभरात सांगोला तालुक्यात हरित क्रांती झालेली पाहायला मिळेल . महायुती सरकारने सांगोला तालुक्यासाठी ५ हजार कोटीहून अधिक निधी दिला. मी दलित समाजासाठी १०० कोटीहून अधिक निधी खर्च केला आहे. ५ वर्षाच्या कालखंडात तालुका सुरक्षित ठेवला. तालुक्यातील सर्व समाजाला निधी देऊन विकासाच्या प्रवाहाच्या दिशेने घेऊन जात आहे. तालुक्यात शंभर कोटी रुपये निधी आणून मागासवर्गीय समाजासाठी आदर्श असे वसतीगृह करण्याचा संकल्प आहे. महुद गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवण्याचे चांगले कार्य मी केले आहे. या निवडणुकीत निवडून देऊन पाच वर्ष काम करण्याची संधी द्यावी, असे विचार आम. शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले.

# सर्वसामान्य तळागाळातील लोकांच्या समस्या प्राधान्याने सोडवणार ; दिपकआबा साळुंखे-पाटील

सांगोला : तळागाळातील आणि सामान्य लोकांपर्यंत आम्ही रोज पोहोचत आहोत. त्यांच्या समस्या, त्यांचे प्रश्न आम्ही ऐकून घेत आहोत. लोकांना विकास हवा आहे. फक्त ओशासन नको तर ज्या काही त्यांच्या मोजक्या समस्या आहेत त्या सोडवण्यात याव्यात असं लोकांकडून सांगण्यात येत आहे.मतदारसंघातील ज्या काही जनसामान्यांच्या समस्या आहेत. त्या सोडवण्याचा पुरेपूर मी प्रयत्न करीत आहे. जनतेची सेवा करण्याची एकवेळ संधी द्यावी, पुढील पाच वर्षे जनतेचा सालगडी म्हणून काम करण्याचं अभिवचन देत सर्वसामान्य लोकांच्या, तळागाळातील लोकांच्या ज्या समस्या आहेत त्या प्राधान्यानं सोडवणार असल्याचा विश्वास महाविकास आघाडीचे उमेदवार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी दिला.महाविकास आघाडीचे उमेदवार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या प्रचारार्थ सांगोला विधानसभा मतदारसंघातील भाळवीगटातील जैनवाडी, शेंडगेवाडी, केसकरवाडी गावात प्रचार सभा संपन्न झाली.

यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अभिषेक कांबळे यांनी सांगितले की, शेकापचे सध्याचे नेतृत्व स्व. गणपतराव देशमुख यांच्या पुरोगामी विचारला फाटा देण्याचा प्रयत्न करीत आहे. विरोधक विकासावर बोलण्यापेक्षा मतदारांना अमिष दाखवत आहेत. विरोधक जातीचे, पैशाचे राजकारण करीत आहेत. दिपकआबांनी ३५ वर्षे जनतेची सेवा केली तर शहाजीबापूंनी ५ वर्षात फक्त खोक्याचं राजकारण केलं. शेकापचे माजी आमदार स्व.गणपतराव देशमुख यांना डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी कधीही मतदान केलं नाही, त्यामुळे डॉ.बाबासाहेब देशमुख यांना मते मागण्याचा अधिकार नाही. त्यामुळे मतदारांनी जातीपातीचे राजकारण विसरून विकासाला प्राधान्य द्यावे. गोरगरीब दीन, दलित, उपेक्षित, वंचित समाजाच्या क्रांतीची मशाल हाती घ्यावी अन् दिपकआबांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी काँग्रेसचे जेष्ठ नेते पी.सी.झपके, शिवसेना जिल्हाप्रमुख संभाजीराजे शिंदे, जेष्ठ नेते साईनाथ अभंगराव, नागनाथ खरात, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अभिषेक कांबळे, आर. डी.पवार, अवि देशमुख, मोहसीन तांबोळी, अक्षय केसकर, लक्ष्मण सुरवसे, हणमंतराव पवार यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसैनिक उपस्थित होते.

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष–४२ वे अंक–२ रा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# डोंगराएवढी प्रचंड विकास कामे केल्याने आ.शहाजीबापू पाटील यांचा मोठ्या मताधिक्याने विजय निश्चित-खा.श्रीकांत शिंदे

सांगोला : सांगोला तालुक्याचे पाणीदार आमदार शहाजीबापू पाटील यांच्या प्रचार सभेसाठी झालेली गर्दी ही त्यांनी केलेल्या विकास कामाची पोहच पावती आहे. तालुक्यातील शेतीच्या व पिण्याचा पाण्याचा प्रश्न शहाजीबापू पाटील यांनी प्राधान्याने सोडवला व तालुक्याचा दुष्काळ हटवला. महायुती सरकारने सांगोला तालुक्याच्या विकासासाठी ५ हजार कोटीहून अधिक निधी देऊन मोलाचे योगदान दिले .तत्कालीन मुख्यमंत्री व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या कामाची व विकास कामासाठी दिलेल्या निधीची ,योजनांची तुलना करून जनतेने महायुती सरकारला पुन्हा सत्तेवर आणावे. आमदार शहाजीबापू पाटील यांनी तालुक्यात डोंगराएवढी प्रचंड कामे केल्याने त्यांचा विजय निश्चित आहे,असा ठाम विश्वास खासदार श्रीकांत शिंदे यांनी महुद येथील प्रचार सभेत व्यक्त केला. २५३ सांगोला विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार शहाजीबापू पाटील यांच्या प्रचारार्थ मंगळवार दिनांक १२ नोव्हेंबर रोजी महुद तालुका सांगोला येथे खासदार श्रीकांत शिंदे यांची जाहीर सभा संपन्न झाली.




पुढे बोलताना खा. श्रीकांत शिंदे म्हणाले, महायुती सरकारने सव्वा दोन वर्षाच्या काळात सर्वसामान्यांसाठी मोठ्या प्रमाणात विकासाच्या योजना अमलात आणल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासन आपल्या दारी सारख्या योजना राबवण्यासाठी रात्रंदिवस काम केले. टेंभू, म्हैसाळ, उजनी, जीहे कटापूर आदी पाणी सिंचनाच्या योजनांचे पाणी चालू केले. शेतकऱ्यांचे वीज बिल माफ केले. तालुक्यातील पीक जळीतासाठी महायुती सरकारने १६६ कोटी रुपयांचा निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर दिला. केंद्र व राज्य सरकारकडून मोठ्या प्रमाणात निधी देऊन महाराष्ट्रातील जनतेला न्याय दिला. तत्कालीन मुख्यमंत्र्यांना जे अडीच वर्षात जमले नाही ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सव्वादोन वर्षात करून दाखवले. यासाठी काम करण्याची प्रबळ इच्छाशक्ती असावी लागते.एक रिक्षा चालक, एका शेतकरी कुटुंबातील मुलगा राज्याचा मुख्य मंत्री राज्याचा कारभार चांगल्या पद्धतीने सांभाळू शकतो हे ज्वलंत उदाहरण म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होय.मुख्यमंत्र्यांना गरीबी विषयी जाणीव असल्याने गरिबाच्या कल्याणासाठी अनेक योजना राबवल्या. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सर्वसामान्य कुटुंबाला वरदान ठरणारी आहे. मुख्यमंत्री सहायता निधीमधून हजारो कुटुंबांना वैद्यकीय खर्चासाठी मदत केली. महाराष्ट्र राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार सत्तेवर येणार असून शहाजीबापूंना विक्रमी मतांनी निवडून द्या. शहाजीबापू पाटील यांना राज्यात मंत्रिपदाची संधी देऊ असे ओशासन यावेळी श्रीकांत शिंदे यांनी दिले.

यावेळी आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, तालुक्यातील दुष्काळ संपवण्यासाठी शेतकरी तसेच सर्वसामान्यांना दुष्काळापासून मुक्त करण्यासाठी स्व. आमदार गणपतराव देशमुख यांच्या विरोधात ७ विधानसभा निवडणूका लढवल्या. तालुक्यातील शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला असून भविष्यात मोठी एमआयडीसी आणून बेरोजगार तरुणांना नोकरी देण्याचे नियोजन केले आहे. उर्वरित विकासकामे पूर्ण करायची आहेत. ज्या गावात दीपकआबांचा जन्म झाला ते गावही म्हैसाळ योजनेत त्यांना बसवता आले नाही .हे कामही मला करावे लागले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे तालुक्यावर खूप मोठे उपकार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तालुक्यासाठी ५ हजार कोटीहून अधिक निधी देऊन तालुक्याच्या विकासाकरिता चांगली भूमिका बजावली. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना जे जमले नाही ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी करून दाखवले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना अमलात आणून महिलांना प्रति महिना १ हजार ५०० रुपये देऊन महिलांचा सन्मान केला.पण विरोधकांना पाहवत नाही . राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी व मला आमदार व मंत्री पदाची संधी देण्यासाठी मतदारांनी रात्रीचा दिवस करावा व मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन आमदार शहाजीबापू पाटील यांनी केले .

यावेळी व्यासपीठावर शिवसेना सचिव संजय मशिलकर, शशिकांतभाऊ देशमुख, नवनाथभाऊ पवार ,शिवाजी अण्णा गायकवाड ,राजश्रीताई नागणे पाटील, राणीताई माने, छायाताई मेटकरी,मुबीना मुलाणी, रूकसाना मुजावर ,रविराज शिंदे, अरुण बिले, सागरदादा पाटील, दिग्विजयदादा पाटील, राजू कोळी, भारत चव्हाण, सचिन गायकवाड, महेश साठे, ओंकार लवटे, शिवाजी दिघे, पिंटू झंगोले , डॉ. विजय बाबर, माऊली तेली,अस्मिर तांबोळी, दुर्योधन हिप्परकर, रामचंद्र ढोबळे, गुंडादादा खटकाळे, अभिजीत नलवडे, अच्युत फुले, दगडू बाबर, आदी पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, ॲड.महादेव कांबळे, आरपीआयचे तालुकाध्यक्ष खंडू सातपुते, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांतदादा देशमुख, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख दीपक दिघे , विद्यार्थी सेनेचे अजिंक्य शिंदे, दत्ताराव नागणे , विजय बनसोडे, होलार समाजाचे नेते दीपक ऐवळे, रामचंद्र ढोबळे आदींनी मनोगत व्यक्त केले.

# आमच्यावरती टीका करुन विरोधकांनी स्वत:चे हसू करुन घेवू नये- डॉ.बाबासाहेब देशमुख



सांगोला : विरोधकांकडून ३ वर्षातए बाबासाहेबांनी काय केले असा सवाल उपस्थित केला जात आहे. ३ वर्षात तुमची झोप उडवलीउ एवढेच मी केले असून २३ नोव्हेंबर जनता तुमची कायम स्वरुपीच झोप उडविणार आहे. त्यामुळे आमच्यावरती टीका करुन स्वत:चे हसू करुन घेवू नये,असे सल्ला डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी विरोधकांना दिला. सांगोला विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी-इंडिया अलायन्स पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. एबाबासाहेब आण्णासाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ उदनवाडी येथे भव्य कॉर्नरसभा संपन्न झाली. यावेळी डॉ.बाबासाहेब देशमुख बोलत होते.व्यासपीठावर डॉ.अनिकेत देशमुख यांच्यासह मित्रपक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.बाबासाहेब देशमुख म्हणाले की, स्व.आबासाहेब यांनी ६० वर्षात कधीही टक्केवारीचे राजकारण केले नाही. गेल्या ५ वर्षात फक्त तालुक्यात टक्केवारीचे राजकारण झाले आहे. त्यामुळे जनता वैतागली असून महिला भगिनींना रात्री ९ नंतर रस्त्यावर फिरणे सुध्दा मुश्कील झाले आहे. गेल्या ५ वर्षात तालुक्यात दोघांनी मलिंदा गँग तयार केली होती. ठराविक लोकांना कामाच्या माध्यमातून निधी दिला.आणि त्या निधीतून टक्केवारी घेऊन स्वत:चा विकास केला असून सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करण्याचे काम केले आहे. जनता आता हुशार झाली असून यंदा जनताच तुम्हाला पुन्हा एकदा घरी बसविल्याशिवाय शांत बसणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. तालुक्यातील दोघा नेत्यांनी फक्त तालुक्याला वेगळे वळण लावले आहे.तालुक्याला गुंडगिरी, टक्केवारीमुळे कलंक लावला आहे. वाळूतस्करांनी धुमाकूळ घालून सर्वसामान्य नागरिकांना त्रास दिला आहे. जनतेच्या कामासाठी प्रत्येक गोष्टीत टक्केवारी घेऊन स्वत:चे खिसे भरले आहेत. तेच खिसे आता रिकामे करण्याची वेळ आली असून जनता फक्त डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ.अनिकेत देशमुख यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभी असून २३ तारखेला शेतकरी कामगार पक्षाचा गुलाल असणार असल्याचे सांगितले.

# पान नं.१ वरुन...शहाजीबापू पाटील यांना विक्रमी मतांनी विजयी करा, तुमची इच्छा पूर्ण करु-मुख्यमंत्री शिंदे

तालुक्यात राबवण्यात येणारी जलजीवन मिशन योजना २५० कोटीची असून निधी मंजूर आहे. प्रत्येक घराला पाणी देण्याचा संकल्प आहे. रस्ते, पाणी, वीज, समाजमंदिरे, धार्मिक स्थळे , यासारख्या कामासाठी खूप मोठा निधी खर्च केला. गुवाहाटीला जाऊन राजकीय क्रांती केली म्हणून महायुती सरकार सत्तेवर आले व तालुक्याला ५ हजार कोटीहून अधिक निधी मिळाला व तालुक्याची विकास कामे करता आली.

यावेळी चेतनसिंह केदार सावंत, मुबिना मुलाणी, प्राध्यापक संजय देशमुख, श्रीकांतदादा देशमुख, दादासाहेब लवटे, आनंद घोंगडे, सुनीलनाना पवार , डॉ. विजय बाबर, विजय बनसोडे, खंडू सातपुते, संभाजीतात्या आलदर, विजयदादा शिंदे, ॲड. महादेव कांबळे आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर आमदार प्रशांतराव परिचारक, शशिकांतभाऊ देशमुख, ॲड.उदयबापू घोंगडे, वृषालीताई पाटील, रेखाताई पाटील, राणीताई माने, छायाताई मेटकरी, राजनंदिनी पाटील, राणीताई पाटील, सागर पाटील, दिग्विजयद पाटील,शिवाजीराव बाबर, शहाजीराव नलवडे, सुभाष इंगोले, नवनाथभाऊ पवार, शिवाजीअण्णा गायकवाड ,डॉ.मानस कमलापूरकर, दत्ता टापरे, एन.वाय.भोसले, जगदीश पाटील, ॲड.बंडू काशीद ,अण्णासाहेब जोल्हे. भारत चव्हाण, आनंदाभाऊ माने, अस्मिर तांबोळी, माऊली तेली, पोपटशेठ यादव, गुंडादादा खटकाळे, दुर्योधन हिप्परकर, बाळासाहेब आसबे, दीपक ऐवळे, अमोल शिंदे, रविराज शिंदे, गोविंदअण्णा जरे, फिरोज खतीब, सौदागर केदार यांच्यासह महिला, शेतकरी ,तरुणवर्ग मतदार बंधू- भगिनीं,आदी मान्यवर उपस्थित होते. सभेला ऐतिहासिक गर्दी झालेली होती. यावेळी धनगर समाजाच्या वतीने माजी नगरसेवक व शिवसेना शहर संघटक आनंदाभाऊ माने व धनगर समाज बांधवांच्या हस्ते गजिढोल, घोंगडी, काठी देऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे होलार समाज, लोणारी समाज यांच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हरिभाऊ पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आमदार शहाजीबापू पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला.



# पुढील पाच वर्षे जनतेचा सालगडी म्हणून काम करणार दिपकआबा साळुंखे पाटील यांचं मतदारांना अभिवचन



सांगोला : गेली २५ वर्षे आघाडीच्या राजकारणात शेकापला सर्वतोपरी मदत केली. स्व.गणपतराव देशमुख यांनी, माझी शेवटची निवडणुक आहे असे सांगितल्याने २०१४ च्या निवडणुकीत त्यांना मदत केली. २०१९ चया निवडणुकीत शहाजीबापूंनी एकवेळ मदत करा, पुढच्या वेळी मी तुम्हाला मदत करतो असे सांगितल्याने त्यांनाही मदत केली. पण यंदा दोघांनीही मला मदत करण्यास नकार दिला. जनतेचा उमेदवार म्हणून मी निवडणुकीच्या आखाडयात उतरलो आहे. वारस हा कर्तृत्वाने सिद्ध होतो. सांगोला तालुक्याच्या पाणी प्रश्नाला काकासाहेबांनी पहिल्यांदा वाचाउ फोडली. गेल्या ५० वर्षात कधी हक्काचे पाणी मिळाले नाही. हक्काच्या पाण्यासाठी किती दिवस लढा द्यायचा हा प्रश्न उपस्थित होत आहे. एकवेळ जनतेची सेवा करण्याची संधी द्यावी, पुढील पाच वर्षे जनतेचा सालगडी म्हणून काम करणार असल्याचं अभिवचन दिपकआबा साळुंखे पाटील यांनी मतदारांना दिले.

महाविकास आघाडीचे उमेदवार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या प्रचारार्थ सांगोला तालुक्यातील एखतपूर गावात प्रचार सभा संपन्न झाली. यावेळी मतदारांशी संवाद साधताना ते बोलत होते.

यावेळी बोलताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रा.पी.सी.झपके म्हणाले की, दिपकआबांनी गेल्यावेळी जुन्या मित्राला मदत केली, जिवाचं रान केलं अन् शहाजीबापूला विजयी केलं.

दिपकआबांमुळे आमदारकीचं. वर्ल्ड रेकॉर्ड झालं, त्या शेकापसह शहाजीबापू देखील दिपकआबाला न्याय देवू शकले नाहीत. आता दिपकआबाला न्याय देण्याची जबाबदारी मतदारांच्या खांद्यावर आहे. त्यामुळे त्यांप्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन केले.

यावेळी सदाशिव नवले, अंकुश इंगोले, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अभिषेक कांबळे, सचिन उबाळे, तुषार इंगळे, दादासो इंगोले, जालिंदर इंगोले, रावसाहेब पाटील, मोहन इंगोले, नेताजी इंगोले, दत्तात्रय इंगोले, मच्छिंद्र इंगोले, विठ्ठल इंगोले, आनंद फाटे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# बारामतीसारखा सांगोला तालुका करून दाखवतो-आम. शहाजीबापू पाटील

## प्रचार सभेदरम्यान युवक कार्यकर्त्यांचा शेकडोंच्या संख्येने शिवसेनेत प्रवेश



सांगोला : महायुती सरकारमधील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सव्वा दोन वर्षात महाराष्ट्रात विकासाभिमुख कामे करून जनतेचा विश्वास संपादन केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमदार शहाजीबापू पाटील यांना सांगोला तालुक्याच्या विकासासाठी पाच हजार कोटीहून अधिक निधी देऊन तालुक्याचा परिपूर्ण विकास करण्यासाठी प्रेरित केले आहे. आमदार शहाजीबापू पाटील यांनी शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवला. तसेच समाजातील प्रत्येक घटकाला विकासासाठी निधी देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले आहे. सर्वच विभागासाठी आमदार शहाजीबापू पाटील यांनी या निधीतून अनेक प्रकारची महत्त्वपूर्ण विकास कामे पार पाडली. आमदार शहाजीबापू पाटील यांची पाणीदार आमदार म्हणून ओळख निर्माण झाली. बारामती सारखा सांगोला तालुका करून दाखवतो असा ठाम विशास आम. शहाजीबापू पाटील यांनी तालुक्यातील वाटंबरे येथे प्रचारादरम्यान व्यक्त केला.

सांगोला तालुक्यातील तिपेहाळी, किडे बिसरी, पाचेगाव बुद्रुक, गौडवाडी, बुद्धेहाळ, सोमेवाडी, कमलापूर, य.मंगेवाडी सोनलवाडी ,वाटंबरे या गावात गुरुवार दि.१४ नोव्हेंबर रोजी आयोजित केलेल्या प्रचारातील कॉर्नर सभेदरम्यान आ.शहाजीबापू पाटील हे बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले,अखेरच्या श्वासापर्यंत तालुक्यातील जनतेच्या सेवेमध्येच राहणार असून ही निवडणूक अटीतटीची असल्याने मतदारांनी गाफील राहू नये. प्रत्येक व्यक्तीचे मत महत्त्वाचे असून त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करून जास्तीत जास्त मताधिक्य कसे मिळेल याकडे लक्ष द्यावे असे आवाहन आम. शहाजीबापू पाटील यांनी प्रचार सभेदरम्यान केले .

यावेळी संभाजीतात्या आमदार , किसान सेलचे नेते शिवाजी अण्णा गायकवाड,भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांतदादा देशमुख, संदीप मोहिते, मच्छिंद्र मोहिते, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, बंडू तंडे ,पप्पू ऐवळे, दादा खरात, माजी नगराध्यक्ष नवनाथभाऊ पवार, सचिन पवार,सूर्यकांत पवार, दत्ता पवार ,प्रवीण घोडके, ॲड. महादेव कांबळे, दीपक ऐवळे, विजय बनसोडे, सचिन पवार, सूर्यकांत पवार, दत्ता पवार यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,खऱ्या अर्थाने शहाजीबापू पाटील यांच्याकडे तालुक्याविषयी आत्मीयता असून त्यांना या निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी करावे असे आवाहन करण्यात आले. यावेळी तालुक्यातील सोमेवाडी व कमलापूर येथे शेकडो कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत आम. शहाजीबापू पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश करून शिवसेना वाढवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

9821569005
9076041977
9890218146

Home Loan
Personal Loan
Education Loan
Vehicle Loan

Mahalaxmi Finance Services.
All types of loan available here

# डॉ.बाबासाहेब देशमुख यांना प्रहार संघटनेचा पाठिंबा




सांगोला : संपूर्ण राज्यभर दिव्यांग बांधवांचे दैवत म्हणून ओळख असलेल्या आ. ओमप्रकाश उर्फ बच्चूभाऊ कडू यांच्या प्रहार दिव्यांग क्रांती संघटना व प्रहार जनशक्ती पक्षाने सांगोला विधानसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. बाबासाहेब देशमुख यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती जिल्हा समनव्यक नविद पठाण व तालुका अध्यक्ष सतीश दिडवाघ यांनी दिली.

प्रहारच्या वतीने आ. बच्चूभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर ' आसूड यात्रा ' काढण्यात आली होती, यावेळी तत्कालीन आ. भाई गणपतराव देशमुख यांनी 'आसूड यात्रेचे' दिनांक १४ एप्रिल २०१७ मध्ये सांगोला शहरात स्वागत केले व सहकार्य केले होते, तसेच दिव्यांग कल्याण निधी नियंत्रण समिती नेमून प्रहारच्या कार्यकर्त्यांला संधी दिली म्हणून दिव्यांग बांधवांच्या हितासाठी आणि वंचित घटकाला भविष्यात न्याय मिळावा, यासाठी सांगोला तालुका प्रहार कार्यकारिणीने शेकापचे उमेदवार डॉ. बाबासाहेब देशमुख यांना पाठिंबा दिला आहे. तसेच सर्व दिव्यांग बांधव व प्रहार कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब देशमुख यांना मतदान करावे असे आवाहन प्रहारच्या वतीने करण्यात आले आहे.

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा...
साप्ताहिक माणदेश वार्ता

# पान नं.१ वरुन..डॉ.बाबासाहेब देशमुख हे निश्चित विधानसभेत जातील : खासदार धैर्यशील मोहिते-पाटील

पान नं.१ वरुन..

यावेळी अतुल पवार म्हणाले की, डॉ.बाबासाहेब देशमुख यांना पाठिंबा देत असताना मी माझ्या एकट्याच्या जीवावर पाठिंबा दिला नसून माझ्या जीवाभावांच्या कार्यकर्त्यांच्या माझ्या पाठीमागे असणाऱ्या सर्वसामान्यांच्या जीवावरती पाठिंबा दिला आहे. गेल्या पाच वर्षात तालुक्यात व्यावसायिक राजकारण झाले असून मेडशिंगीचे कोविड सेंटर तालुक्यातील चुकीच्या माणसांनी बंद केले अशा चुकीच्या माणसांना तालुक्याच्या राजकीय पटलावरून बाहेर केले पाहिजे असे सांगत मी जातीपातीच्या राजकारणाला मानणारा कार्यकर्ता नाही.यापुढे सर्वसामान्यांचा ठोस विकास करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. खा.मोहिते पाटील यांनी सांगोला मतदारसंघात शेतकरी कामगार पक्ष आणि महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रचार सभांचा धडाका लावल्याने विरोधी गोटात अस्वस्थता निर्माण झाली आहे. खा. मोहिते पाटील यांच्या प्रचारामुळे डॉ. बाबासाहेब देशमुख हेच महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असल्याचे स्पष्ट झाले आहे.